# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
### प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित शाश्वत विकास कार्यशाळेत शहरातील प्रदूषण रोखण्यासाठी नियमावली जाहीर**

मिरा भाईंदर शहराच्या प्रगतीसाठी पर्यावरण आणि विकासाचा समतोल आवश्यक असल्याने डेव्हल्पमेंट विथ सस्टेनेबलिटी अर्थात शाश्वत विकास या कार्यशाळेचे आयोजन दिनांक 03 जानेवारी 2025 रोजी लता मंगेशकर नाट्यगृहात मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. यावेळी शहरातील विकासकामे करताना निर्माण होणारे प्रदूषण, कचरा, वाहतूक कोंडी आदी विविध समस्येवर तोडगा काढण्यासाठी मिरा भाईदर महापालिकेने कडक नियमावली तयार केली आहे.

बांधकामांच्या ठिकाणी जाळी आणि 25 फूट उंचीचे पत्रे लावणे, कलर कोड नुसार बॅरिगेट लावणे, ट्रकने माती-रेतीची वाहतूक होताना माती उडू नये म्हणून आवरण घालणे अनिवार्य करण्यात आले आहे. आरएमसी प्लांटने नियमांचे उल्लंघन केल्यावर दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. ब्रीद इजी अभियानांअतर्गत महापालिका मा. आयुक्त यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या डेव्हल्पमेंट विथ सस्टेनेबलिटी अर्थात शाश्वत विकास या कार्यशाळेत ही नियमावली जाहीर करण्यात आली.

मिरा भाईंदर शहरात विविध ठिकाणी विकास कामे सुरू आहेत. मात्र ही कामे करताना नियोजन नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असते. माती, रेती, सिमेंट आदींची ने-आण करताना ते झाकले जात नाही. त्यामुळे बांधकाम साहित्य, मातीचा राडारोडा, रस्त्यावर पडत असतो यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊन अपघाताची शक्यता निर्माण होते. बांधकाम करताना योग्य काळजी न घेतल्याने निर्माण होणाऱ्या धूळीमुळे नागरिकांना श्वसनास त्रास होतो. या समस्यांवरील उपायोजनांवर चर्चा करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

महापालिका मा. आयुक्त यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना पालिकेने केलेल्या डिप क्लिन ड्राईव्ह, दैनंदिनी स्वच्छता आदी उपक्रमांची माहिती दिली. शहरातील 80 टक्के ई कचरा काढण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. प्रदूषण रोखण्यासाठी त्यांनी बांधकामाच्या राडारोड्या पासून विटा तयार करणाऱ्या C&D वेस्ट प्रकल्पाबाबत माहिती दिली. बांधकामाच्या जागी संरक्षक जाळी लावणे, 25 फूट पत्रे उभारणे, रस्त्यावर कामे सुरू असताना कलर कोडनुसार बॅरिगेटींग करणे, ट्रकने माती-रेतीची वाहतूक होताना माती उडू नये म्हणून आवरण घालणे आदी अनिवार्य असल्याचे सांगितले. आरएमसी प्लांटमधून प्रदूषण होत असून त्यांनी नियमांचे पालन न केल्यास मोठ्या दंडात्मक कारवाईचा इशारा दिला. कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी मोठ्या संकुलांना कचऱ्याचे विलिगीकरण करून खत निर्मिती प्रकल्प राबविण्याचे निर्देश दिले.

शाश्वत विकासाच्या दृष्टीने महापालिकेने एमबीएमसी@२०४७ या कॉनक्लेव्हचे आयोजन केले होते. येत्या काळात महापालिका सीएसआर कॉन्क्लेव्ह पर्यावरण विषयावर करणार असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले. या कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर व शहर अभियंता दिपक खांबित यांनी शहरातील हवेची स्थिती आणि विकास कामे सुरू होत असताना दुर्लक्षित होणाऱ्या बाबी दाखविल्या. यामुळे दैनंदिन जीवनात नागरिकांना त्रास होत असून महापालिका काय उपाययोजना करणार हे सांगितले. अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांनी ब्रीद इजी अभियानाचा हेतू, उद्दीष्टे सांगून अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले. सदर कार्यशाळेस, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, शहर अभियंता दिपक खांबित, उपायुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त सचिन बांगर, उपायुक्त प्रसाद शिंगटे, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता शरद नाणेगावकर आणि इतर सर्व अधिकारी, अभियंते, कंत्राटदार, विकासक आणि युटीलिटी सर्व्हिस प्रोव्हाइडर आदी उपस्थित होते.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका